नियमित फौजदारी खटला क्र. १४/२०२५
महाराष्ट्र शासन वि. शुभम वगैरे
निशाण क्र. १४

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ ची साक्ष**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव - संदेश रामचंद्र कोयंडे
वय - ५९ वर्षे
व्यवसाय - काही नाही.
रा/ने - धुरीवाडा मालवण, ता. मालवण, जि. सिंधुदूर्ग

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोगक्ता श्रीमती यु.आर.जाधव यांचेमार्फत शपथेवर सरू**

१. मी पिटर गॅब्रीयल फर्नांडीस याच्या प्रकरणामध्ये साक्ष देण्यासाठी आलो आहे. पिटर याला मारहाण झाली होती. पिटरला अक्षय बांदकर, ललित भगत व शुभम भगत यांनी दि. १९/०३/२०२५ रोजी मारहाण केली होती. मारहाण करताना मी घटनास्थळावर नव्हतो. हे तिघे पिटर फर्ना।डीस याच्या गेटजवळ दि. १९/०३/२०२५ रोजी पल्सर गाडीवर बसले होते. मी त्यांना विचारले की, इथे का बसला आहे.

२. पोलीसांनी मला दि. २०/०३/२०२५ रोजी पिटरच्या घराच्या समोर पंचनामा करण्यासाठी बोलविले होते. मी त्या ठिकाणी गेलो होतो. माझ्यासोबत अजून एक पंच होते. घटनास्थळ पिटर याने दाखविले. त्या ठिकाणी लोखंडी गेटच्या बाहेरील बाजूस दांडा पडलेला होता. घटनास्थळ फिर्यादीच्या घराच्या समोर होते. त्याच्या घरापासून गेट हे साधारण ३० ते ३५ फूट अंतरावर आहे. पोलीसांनी त्या दांडयाचा पंचनामा करुन जप्त केला. पोलीसांनी पंचनामा तयार केला. साक्षीदारास दि. २०/०३/२०२५ रोजीचा घटनास्थळ वजा जप्तीपंचनामादाखविला. त्यावर माझी अ.क्र. १ येथे सही आहे. त्यावर दुसरे पंच विल्सन फर्नांडीस व पोलीसांचीसही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास नि.क्र. पी३/पीडब्ल्यू२ देण्यात येते. मी आरेपीस दाखविल्यास मी ओळखू शकतो. ते आज न्यायालयात हजर आहेत. जो दांडा पोलीसांनी जप्त केला तो तीन साडेतीन फूट लांबीचा असून वाकडा तिकडा असून आकाशी लाकडाचा होता. पोलीसांनी माझ्या समक्ष एम.ओ.नं.१ जप्त केला होता. त्यावर लावलेल्या लेबलवर माझी सही आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञ श्री.एस.के.जाधव यांचेमार्फत</u>**

३. फिर्यादी हे धुरीवाडा येथे राहतात त्यामुळे त्यांची व माझी ओळख असून त्यांचे व माझे संबंध चांगले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा येण्याकरीता पोलीसांनी मला पत्र दिले नव्हते. हे म्हणणेखरे आहे की, कथीत घटनास्थळाचा सर्व्हे नंबर काय हि.क्र. काय हे पाहण्यासाठी मी ७/१२ पाहिला नाही तसेच मला सर्व्हे नंबर सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, घराची समोरची एन्ट्री असते तो घराचा समोरील भाग असतो. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीच्या घराचे प्रवेशव्दार हे पश्चिम दिशेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घराच्या पश्चिम दिशेला कथीत पंचनामा केला असे माझे म्हणणे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांना पंचनामा सांगितला व पोलीसांनी तो लिहून घेतला असे घडले नाही. मला ज्या घटनेबद्दल मी पंचनामा केला त्या गुन्हयाचा एफआयआर नंबर मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्याच्या पहिल्या शब्दापासून शेवटा शब्द काय लिहिला आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सागरी महामार्गावर रात्रंदिवस गाडयांची वर्दळ असते. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनेच्या रस्त्यावर स्ट्रीट लाईट नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनास्थळाच्या आजुबाजूला भंगारवाल्यांची दुकाने आहेत. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळापासून ढोलम यांचे घर हाकेच्या अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रत्यक्ष कथीत घटना न पाहिल्याने नेमके काय घडले हे मी सांगू शकत नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, मी पिटर गॅब्रीयल फर्नांडीस याच्या प्रकरणामध्ये साक्ष देण्यासाठी आलो आहे, पिटर याला मारहाण झाली होती, पिटरला अक्षय बांदकर, ललित भगत व शुभम भगत यांनी दि. १९/०३/२०२५ रोजी मारहाण केली होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, हे तिघे पिटर फर्नांडीस याच्या गेटजवळ दि. १९/०३/२०२५ रोजी पल्सर गाडीवर बसले होते. मी त्यांना विचारले की, इथे का बसला आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला दि. २०/०३/२०२५ रोजी पिटरच्या घराच्या समोर पंचनामा करण्यासाठी बोलविले होते, मी त्या ठिकाणी गेलो होतो, माझ्यासोबत अजून एक पंच होते, घटनास्थळ पिटर याने दाखविले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी लोखंडी गेटच्या बाहेरील बाजूस दांडा पडलेला होता, घटनास्थळ फिर्यादीच्या घराच्या समोर होते, त्याच्या घरापासून गेट हे साधारण ३० ते ३५ फूट अंतरावर आहे,

पोलीसांनी त्या दांडयाचा पंचनामा करुन जप्त केला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, जो दांडा पोलीसांनी जप्त केला तो तीन साडेतीन फूट लांबीचा असून वाकडा तिकडा असून आकाशी लाकडाचा होता, पोलीसांनी माझया समक्ष एम.ओ.नं.१ जप्त केला होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, काठी व दांडा यामध्ये फरक आहे. हे म्हणणेखरे आहे की, दांडा हा गोलाकार व भरीव असतो. हे म्हणणे खरे आहे की, एम.ओ.नं.१ दांडा नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, तो भरीव आहे. हे म्हणणे खरे नाही की, एम.ओ.नं.१ सारखी काठी कोठेही मिळत नाही. हे म्हणणे खरे आहे की, कृषी विषयक ज्ञान घेतलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की,एखाद झाड पान, फळ इत्यादी कशाचे आहे हे जाणून घेण्यासाठी कृषीचे ज्ञान घेणे आवश्यक आहे. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनास्थळाच्या आजूबाजूला आकेशीचे झाड नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला कृषीचे ज्ञान नसल्यामुळे एम.ओ.नं. १ कशाचे आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, कथीत पंचनाम्यावर पोलीसांनी किती सहया घेतल्या होत्या हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, एम.ओ.नं.१ टेपने मोजून त्याची लांबी व गोलाई मी पोलीसांनी व मी मोजली नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझया वाडीतील असल्याने त्याचे व माझे संबंध चांगले असल्याने मी आज कोर्टात साक्ष देण्यासाठी आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी कोणताही पंचनामा केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, कथीत पंचनाम्यानंतर माझा पोलीसांना भेटण्याचा योग आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी शुभम विलास बांदकर, ललित दशरथ भगत व अक्षय दशरथ भगत यांच्याविरुध्द खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

एम.के.फकीह

दि. ११/०३/२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग - १ मालवण.